सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**दुरध्वनी** - 02363 272005
ई - मेल dcfsawantwadi@gmail.com

उपवनसंरक्षक,वनविभाग सावंतवाडी यांचे कार्यालय
वनभवन, सालईवाडा, सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग

---

जा.क्र.ब/तांत्रिक सहाय्यक/फुलपाखरु उद्यान/ /२०२२.२३
सावंतवाडी दिनांक - /03/2023

**तांत्रिक सहाय्यक - कंत्राटी पद भरणे बाबत.**

**सविस्तर जाहिरात**

कोल्हापूर वनवृत्तांतर्गत सावंतवाडी वन विभागामध्ये आंबोली येथे फुलपाखरु उद्यान व इतर निसर्ग पर्यटन स्थळामध्ये फुलपाखरु संबंधित तांत्रिक सेवा देणेबाबत तांत्रिक सहाय्यक पदासाठी इच्छुक उमेदवार यांचेकडून दिनांक 31 मार्च 2023 पर्यंत अर्ज मागविणेत येत आहेत. तसेच दिनांक 31 मार्च 2023 पर्यंत या कार्यालयास अर्ज सादर केलेल्या व खालील प्रमाणे शैक्षणिक व इतर अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारास दिनांक 03 एप्रिल 2023 रोजी सकाळी 11:30 वा. या कार्यालयामध्ये मुलाखतीस बोलवण्यात येत आहे.

1. **शैक्षणिक पात्रता व इतर अर्हता** :-

   अ) Any science graduate (Preferably degree with entomology as subject).
   ब) फुलपाखरु संबंधित तांत्रिक ज्ञान / अनुभव असलेल्या उमेदवाराला प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
   क) शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

2. **कामाचे स्वरुप** :-

   अ) या विभागाअंतर्गत असलेले आंबोली फुलपाखरु उद्यान देखरेखकामी तांत्रिक सेवा देणे.
   ब) Host plant व nectar Plant रोपवाटीकेचे संगोपन करणे.
   क) या विभागातील इतर वन पर्यटन स्थळांमधील फुलपाखरु संबंधित तांत्रिक सेवा देणे.
   ड) फुलपाखरु उद्यानात जास्तीत जास्त पर्यटक येतील अशाप्रकारे नियोजन करणे.
   इ) उप वनसंरक्षक यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने काम करणे.

   केलेल्या कामाचा दर आठवड्याला साप्ताहिक अहवाल उप वनसंरक्षक यांचेकडे सादर करणे.

**पद संख्या** - 01

**कार्यक्षेत्र** - सिंधूदुर्ग जिल्हा.

3. **नियुक्तीचा कालावधी** :-

सदर कंत्राटी पद किमान 11 महिन्याच्या कालावधी पर्यंत भरणेचे असून आवश्यकतेनुसार अटी व शर्ती न बदलता नियुक्ती कालावधी अजून 11 महिन्यांपर्यंत वाढविण्यात येईल, तसेच कोणत्याहीक्षणी पूर्व सूचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

4. **इतर अटी व शर्ती** :-

क) कंत्राटी पध्दतीने नियूक्ती देण्यात आल्यामुळे संबंधित शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / समावून घेण्याचे व नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा हक्क / अधिकार नसेल.

ख) विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा कंत्राटी पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.

ख) कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

घ) कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचे गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

च) कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पालन करणे आवश्यक राहील.

छ) कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांचेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील.

ज) फुलपाखरू संबंधित तांत्रिक कामे व संशोधन केल्याचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

झ) प्राप्त झालेले अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच सदर प्रक्रिया थांबविण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहेत.

ट) निवड प्रक्रियेत अयशस्वी ठरलेल्यांचे बाबतीत कोणत्याही पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

ठ) नियुक्तीच्या कालावधीत तांत्रिक सहाय्यक यांचे मुख्यालय आंबोली असणे बंधनकारक आहे.

**टिप** :-

**समांतर आरक्षण** -

सदर पद हे कंत्राटी पध्दतीने भरावयाचे असल्याने या पदास सामाजिक आरक्षण लागु होत नाही.

5. **निवडीची कार्यपध्दती** :-

अ) जाहीरातीत नमुद केलेल्या निकषांनुसार विहीत केलेल्या अर्हता /अटी/शर्ती पुर्ण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल.

ब) मुलाखत निश्चित करण्यात आलेल्या निवड समिती मार्फत घेण्यात येईल.

क) निवडीच्या निकषानुसार मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या आधारे अंतिम निवड करण्यात येईल.

**वयोमर्यादा** :- 21 ते 45 वयोगटामधील.

6. अर्जदाराने स्वहस्ताक्षरात लिहिलेला /टंखलिखित अर्ज (संपुर्ण माहिती असलेला जसे संपूर्ण नाव, जन्मतारीख, पत्ता, शिक्षण, अनुभव इत्यादी) दिनांक 31 मार्च 2023 पर्यंत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत या कार्यालयाचे खालील पत्त्यावर सादर करावेत.

**कार्यालयाचा पत्ता** :- उप वनसंरक्षक वन विभाग सावंतवाडी यांचे कार्यालय, वन भवन, सालईवाडा, सावंतवाडी जिल्हा सिंधूदुर्ग 416510

7. आवश्यकतेनुसार अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.

8. अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

9. **मुलाखत तारीख व वेळ** :-

दिनांक 31 मार्च 2023 पर्यंत या कार्यालयास अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस दिनांक 03 एप्रिल 2023 रोजी सकाळी 11:30 वा. या कार्यालयामध्ये मुलाखतीस बोलवण्यात येत आहे. सदर तारखेमध्ये बदल झाल्यास अर्जदारास संपर्क साधून कळविणेत येईल.

10. **वेतन/मानधन** :-

अर्जदार यांनी अर्जामध्ये त्यांना अपेक्षित वेतन/मानधन व प्रवासखर्च नोंदवावा.

**ठिकाण** :- सावंतवाडी.

**दिनांक**:- 23.03.2023.

**(एस. नवकिशोर रेड्डी)**
**उप वनसंरक्षक**
**वन विभाग सावंतवाडी**

# अर्जाचा नमुना

प्रति,

उप वनसंरक्षक(प्रादेशिक) सावंतवाडी

वन भवन, सालई वाडा,

सांवतवाडी

जि- सिंधूदुर्ग 416510

विषय : पशूवैद्यकीय अधिकारी – कंत्राटी पद भरणे बाबत.

संदर्भ : वनविभागाचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली सविस्त्र जाहिरात

1. अर्जदाराचे संपुर्ण नाव :-

   आडनाव स्वत:चे नाव वडिलांचे नाव

2. जन्मतारीख :-

3. शैक्षणिक पात्रता :-

4. संपूर्ण पत्ता :-

5. संपर्क / मोबाईल क्रमांक:-

6. ई मेल आयडी :-

7. पूर्व अनुभव बाबत तपशिल –

8. वेतन/मानधन व प्रवासखर्च अपेक्षा :-

9. इतर:-

मी,..................................................शपथपूर्वक सादर करतो की उपरोक्त नमुद माहिती हि सत्य असून तयाकरीता मी जबाबदार राहिल. उपरोक्त कंत्राटी पदावर नियुक्ती मिळाल्यास सर्व अटी शर्तीचे मी पालन करेल, तसेच शासकीय सेवकाची जो कर्तव्ये असतात त्यात कसुर करणार नाही व इतर कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही.

दिनांक :-

ठिकाण:- अर्जदाराचे सही